## जनसंपर्क विभाग

जळगाव शुक्रवारी (दि. १०) : शोषित, वंचित अशा सर्व समाजघटकांना माणूस म्हणून जगता यावे यासाठी रमाई आणि बाबासाहेब यांनी महान कार्य केले आहे. रमाईची करुणा काळजात आणि भिमाईचा विचार डोक्यात असला तरच परिवर्तन शक्य आहे असे परखड प्रतिपादन विचारवंत, कवयित्री प्रा. डॉ. प्रतिभा अहिरे यांनी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या सामाजिक शास्त्रे प्रशाळेतील डॉ. आंबेडकर विचारधारा विभागाच्या वतीने दोन दिवसीय त्यागमूर्ती रमाई आंबेडकर जयंती महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवाचे उद्घाटन प्रा. अहिरे यांच्या हस्ते झाले. यावेळी बोलताना त्या पुढे म्हणाल्या की, रमाई यांची प्रतिमा केवळ करूणा, त्यागमूर्ती, सोशिक म्हणून पुढे आणण्यात येते. रमाई या अत्यंत कणखर, स्वाभिमानी होत्या. पती डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मानवमुक्तीचे युध्द यशस्वी व्हावे, यासाठी त्यांनी प्रयत्न केले. आज रमाईंचा त्याग व स्वाभिमानी बाणा लक्षात घेण्याची गरज आहे.

यावेळी विभाग प्रमुख प्रा. राकेश रामटेके यांनी केले. ते म्हणाले, डिजिटल युगात सामाजिकशास्त्रे विभागाने लोकाभिमुख, सृजनशील व्हावे यासाठी विभाग विविध उपक्रम राबवत आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सामाजिक शास्त्रे प्रशाळेचे संचालक प्रा. अजय पाटील होते.ते आपल्या भाषणात म्हणाले की सामाजिक शास्त्रे विभाग हा विद्यापीठ आणि समाजाला जोडणारा दुवा आहे. यावेळी डॉ. उमेश गोगाडीया, प्रा. अनिल डोंगरे, यांनी समयोचित मनोगत व्यक्त केले. प्रारंभी संगीत विभागाचे डॉ. सागर चक्रनारायण यांनी रमाई यांच्या जीवनावर गित सादर केले. यावेळी सामाजिकशास्त्रे प्रशाळेतील विद्यार्थी आणि प्राध्यापक यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

यावेळी प्रा. सोरडे, डॉ. अभय मनसरे, डॉ.समाधान कुंभार, डॉ. विनित काकडे, प्रा. रोशन मावळे, डॉ.गजानन देशमाने, डॉ. कविता पाटील, डॉ. मनोज इंगोले, डॉ. जगन्नाथ सावंत, डॉ. सागर चक्रनारायण, प्रा.आकाश लोणकर, प्रा.योगेश माळी, प्रा.प्रशांत सोनवणे, प्रा. पाठक मॅडम, प्रा. वर्षा पालखे, डॉ. प्रदीप गोफणे, डॉ. सुषमा तीनगोटे, डॉ. माही फुलबांदे, प्रा. मोईन शेख , प्रा. विनेश पावरा, प्रा योगेश माळी, प्रा. विरेश पाटील, डॉ. दिगंबर सावंत, श्री. विजय कोळी, सचिन धुंदले, पूनम मिसाळ, गौरव कटारे आदिंसह मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. सुत्रसंचलन प्रा डॉ. विजय घोरपडे यांनी केले. आभार प्रा. पौर्णिमा वाहाणे यांनी मानले.

यानंतर दुपारी २:०० वाजता रमाई प्रश्नमंजुषा स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत विविध प्रशाळेतील तसेच विविध महाविद्यालयातील ७० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेचे परीक्षक म्हणून प्रा.रोशन मावळे , डॉ.अभय मनसरे , डॉ.समाधान कुंभार , डॉ.गजानन देशमाने व डॉ.विनीत काकडे यांनी काम पहिले.

**बक्षीस वितरण समारंभ**

त्यागमूर्ती रमाई आंबेडकर जयंती महोत्सवात दिनांक ०७ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११:०० ते दुपारी ०१:०० या वेळेत प्रा.पवित्रा पाटील मॅडम यांच्या उपस्थितीत गीत गायन स्पर्धा आणि काव्यवाचन स्पर्धा संपन्न झाल्या . यावेळी गीत गायन स्पर्धेचे परीक्षक म्हणून संगीत विभागाचे डॉ.सागर चक्रनारायण , तत्वज्ञान विभागाच्या प्रा.पाठक मॅडम, समाजकार्य विभागाच्या डॉ.सुषमा तीनगोटे यांनी काम पहिले. तसेच काव्यवाचन स्पर्धेचे परीक्षक म्हणून प्रा.आकाश लोणकर , डॉ.जगन्नाथ सावंत , डॉ. माही फुलबांदे मॅडम यांनी काम पहिले. दि.६ व ७ फेब्रुवारी २०२६ असे दोन दिवसापासून सुरु असलेल्या प्रश्नमंजुषा स्पर्धा, गीत गायन स्पर्धा आणि काव्यवाचन स्पर्धा संपन्न झाल्या. या विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण दुपारी २:०० वाजता विद्यापीठाचे मा.प्र-कुलगुरू, प्रा.एस.टी.इंगळे सर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. यावेळी मंचावर अधिष्ठाता प्रा.अनिल डोंगरे, डॉ.आंबेडकर विचारधारा विभागाचे प्रमुख प्रा.राकेश रामटेके यांची प्रमुख उपस्थिती होती.

बक्षीस वितरण समारंभाच्या अध्यक्षीय भाषणात कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे प्र कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे म्हणाले की, त्याग मूर्ती रमाई भीमराव आंबेडकर यांचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सुरू केलेल्या समाज परिवर्तनाच्या लढ्यात मोठे योगदान होते. त्याचबरोबर पुणे करार, हिंदू कोड बिल निर्मिती या महत्त्वाच्या कार्यात देखील त्याग मूर्ती रमाई आंबेडकर यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना मोलाची साथ दिली. रमाई या खरोखर त्याग मूर्ती होत्या. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर रमाईंना म्हणायचे की रमाई ही माझी सायलेंट स्ट्रेंथ आहे.

एकूणच रमाई आंबेडकर ह्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासाठी ऊर्जा व स्फूर्ती स्थान होत्या. पुढे ते म्हणाले की आजच्या रमाई आंबेडकर जयंती महोत्सवात घेण्यात आलेल्या प्रश्नमंजुषा स्पर्धा, गीत गायन स्पर्धा आणि काव्यवाचन स्पर्धा अशा स्पर्धांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना छत्रपती शिवाजी महाराज, मा जिजाऊ साहेब, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले महात्मा फुले राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर र बाबासाहेब आंबेडकर व त्याग मूर्ती रमाई आंबेडकर अशा महान पुरुष आणि महान स्त्रियांच्या कार्यकर्तृत्वाबद्दल माहिती व खरा इतिहास अभ्यासायला मिळतो. यातून विद्यार्थ्यांच्या सामाजिक जाणीवा प्रगल्भ होतात.

यावेळी विद्यापीठाचे प्र कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे यांच्या हस्ते विविध स्पर्धेतील विजेत्या खालील स्पर्धकांना पारितोषिक वितरण करण्यात आले. गीत गायन स्पर्धेत संगीत विभागाचे विद्यार्थी अनुराग जगदाळे व माधुरी महाजन यांना प्रथम क्रमांक [रोख १००० रु रोख स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र] विभागून देण्यात आला..तर संगणक शास्त्र प्रशाळेचा विद्यार्थी प्रशिक बोदडे याने द्वितीय क्रमांक [रोख ७०० रु व

स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र ] मिळविला तसेच डॉ. आंबेडकर विचारधारा विभागाची विद्यार्थीनी संध्या जाधव हिने तृतीय क्रमांक [रोख ५०० रु स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र ] पटकावला.

तसेच काव्यवाचन स्पर्धेत केमिकल सायन्स चा विद्यार्थी हरीश सोनवणे याने प्रथम क्रमांक [रोख १००० रु रोख स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र] पटकावला. तर सागर सुखदेव कोळी, अमळनेर याने द्वितीय क्रमांक [रोख ७०० रु व स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र] पटकावला. तसेच माधुरी महाजन हिने तृतीय क्रमांक [रोख ५०० रु स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र ] पटकावला.

तसेच प्रश्न मंजुषा स्पर्धेत संदीप भूपेंद्र सोनवणे याने प्रथम क्रमांक [रोख १००० रु रोख स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र] पटकावला. तर सामाजिक शास्त्रे प्रशाळेचे विद्यार्थी जगन्नाथ ठाकुर.व यशोदीप पाटील यांना द्वितीय क्रमांक [रोख ७०० रु व स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र विभागून देण्यात आला. तसेच पुरुषोत्तम पवार याने तृतीय क्रमांक [रोख ५०० रु स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र ] पटकावला.

या बक्षीस वितरण समारंभाचे सूत्रसंचालन डॉ. आंबेडकर विचारधारा विभागातील सहाय्यक प्राध्यापक डॉ. विजय घोरपडे यांनी केले तर डॉ. पौर्णिमा वाहने यांनी आभार व्यक्त केले. यावेळी विद्यापीठातील विविध प्रशाळेतील विद्यार्थी व प्राध्यापकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: १० फेब्रुवारी, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता